# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २७ जुलै, २०१६
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

**दोन** : **स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**तीन** : **औचित्याचे मुद्दे.**

**चार** : **शासकीय विधेयक :**

**पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१६.**

**पाच** : **लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री बाळासाहेब मुरकुटे, जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, भारत भालके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"दरवर्षी पंढरपूर येथे भरणारी आषाढी एकादशी यात्रा, मात्र यावर्षीच्या यात्रेत शासकीय यंत्रणेत प्रचंड प्रमाणात दिसून आलेली अनियमितता, पंढरपूर नगरपालिकेतर्फे या यात्रेसाठी राखून ठेवलेली ६५ एकर जागा, तरी देखील या जागेमध्ये शासकीय यंत्रणेद्वारा योग्य त्या सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या नसणे, राज्याचीच नव्हे तर संपूर्ण देशाची अस्मिता असणाऱ्या या देवस्थानाच्या यात्रेस भाविकांच्या मनात असलेले अनन्यसाधारण महत्व, राज्याचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते पंढरपुरच्या विठ्ठलाची महापुजा होत असताना सुध्दा यंत्रणेकडून होणाऱ्या अक्षम्य चुका, लोक प्रतिनिधी, लोकसभा सदस्य, विधानसभा सदस्य महत्वाच्या व्यक्तींसाठी प्रवेशपत्र तयार असून सुध्दा लोकप्रतिनिधींना पुजेच्या वेळी प्रवेश न मिळणे, तसेच सदर प्रवेशपत्र बाजारात काही विशिष्ट रक्कम देऊन मिळत असल्याने सदर प्रवेशपत्रांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याची शक्यता, एकंदरीतच संपूर्ण यात्रेची पूर्व कल्पना असून देखील चंद्रभागेच्या परिसरात दिसून आलेली अस्वच्छता, यामुळे राज्य शासनाची प्रतिमा मलिन होणे, याबाबत स्थानिक जनता, वारकरी संप्रदाय व भाविकांमध्ये प्रचंड प्रमाणात असलेली नाराजी याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(२) **सर्वश्री संग्राम थोपटे, विजय वडेट्टीवार, हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अस्लम शेख मो.आरिफ नसीम खान, प्रा.वीरेंद्र जगताप, श्री. एकनाथराव खडसे-पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील पिंपरी-चिंचवड, धुळे व जळगांव येथील औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) १२०० हेक्टर जमिनीपैकी १०% खुले क्षेत्र म्हणून मोकळी जागा आणि ५% जागा सुविधा क्षेत्रासाठी आरक्षित ठेवणे बंधनकारक असून या आरक्षित क्षेत्रावर उद्याने, खेळाचे मैदाने व सांस्कृतीक भवन आदी सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक असतानाही या सर्व बाबींकडे पिंपरी चिंचवड औद्योगिक विकास महामंडळाकडून पूर्णपणे करण्यात आलेले दूर्लक्ष, ही आरक्षणे विकसीत करण्यासाठी ६४ भूखंड पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली असणे, या ६४ भूखंडापैकी ७०% भूखंडावर अतिक्रमण करुन बळकवण्यात आलेले भूखंड, सुविधा क्षेत्रांसाठी राखीव १५० एकर जमिनीचे ४०४ भूखंड तयार करुन त्याची परस्पर अनधिकृतरित्या केलेली विक्री, त्या जमिनीच्या एकूण क्षेत्रापैकी केवळ ४ लाख ४८ हजार ७६ चौरस मिटर इतक्या क्षेत्राचीच माहिती (रेकॉर्ड) औद्योगिक विकास महामंडळाकडे उपलब्ध असून ११२ भूखंडाची कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध नसणे, चिंचवड येथील मोहननगर भागातील उद्यानासाठी आरक्षित भूखंडावर बांधले गेलेले बहूमजली हॉटेल, एका भूखंडावर कारखाण्याचे आरक्षण असतांनाही तेथे सुरु केलेले आंतरराष्ट्रीय महाविद्यालय, प्रकल्पग्रस्तांच्या नावाखाली भूखंड नावावर करुन कोट्यवधी रुपयांचा करण्यात आलेला गैरव्यवहार, या सर्व बेकायदेशीरपणे केलेल्या प्रकरणांची सखोल चौकशी करुन त्यात सहभागी असलेल्या महापालिका व औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मा. मुख्यमंत्र्यांकडे दि. २३ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेली मागणी, तसेच अहमदनगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सुविधा क्षेत्रासाठीच्या १०४ भूखंडाची अनधिकृतपणे परस्पर विक्री केलेले भुखंड, दि. १५ जून, २०१६ रोजीच्या न्यायालयाच्या आदेशाने पुन्हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात घेतल्याच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवड येथील भूखंड पुन्हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून ताब्यात घेण्याची होत असलेली मागणी, राज्यामध्ये अशा प्रकारे नियमबाह्य वापरात असलेले भूखंड परत घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना."

(३) **सर्वश्री सुभाष भोईर, सुनिल प्रभू, डॉ. मिलिंद माने, सर्वश्री सुधाकर कोहळे, सुधाकर देशमुख, कृष्णा खोपडे, अतुल भातखळकर, संजय पोतनीस, किसन कथोरे, नरेंद्र पवार, संदीप नाईक, मंगेश कुडाळकर, अमीन पटेल, डॉ बालाजी किणीकर, सर्वश्री पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, मो.आरिफ नसीम खान, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री कालिदास कोळंबकर, जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, सरदार तारासिंह, प्रकाश आबिटकर, सुनिल शिंदे, ॲड भिमराव धोंडे, सर्वश्री हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, विलास तरे, अबू आजमी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"दि. २६ मे, २०१६ रोजी डोंबिवली औद्योगिक विकास महामंडळातील (जि.ठाणे) प्रोबेस कंपनीमध्ये बॉयलरचा स्फोट होऊन त्यामध्ये १३ जणांचा मृत्यू व १८३ जण गंभीर जखमी झाले असून जवळपास ३ हजार घरांचे झालेले नुकसान, ३ ते ४ किलोमीटर परिसराला बसलेले धक्के, यामध्ये मोठ्या प्रमाणावर जीवित तसेच वित्त हानी होणे, जखमी व्यक्तींच्या उपचारांवरील खर्च शासन करेल असे घोषीत करुन देखील शासनाने पिडीतांना मदत न देणे, अनेक इमारतींच्या पायाला धक्के बसल्याने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची होत असलेली मागणी, डोंबिवली एमआयडीसी निवासी विभागामध्ये असलेल्या अनेक कंपन्या मोठ्या प्रमाणावर रासायनिक वायू तसेच कंपनीतील पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता नाल्यामध्ये सोडत असल्यामुळे डोंबिवली परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर वायू तसेच जलप्रदूषण होणे, याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, प्रोबेस कंपनीतील स्फोटानंतर शासनाने सदर रासायनिक कंपन्यांवर कारवाई करण्याचे तसेच कंपन्या हटवण्याबाबत कार्यवाही करण्याचे दिलेले आश्वासन, परंतु त्याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न होणे, सदर स्फोटासाठी एमआयडीसी प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि औद्योगिक सुरक्षा विभागाची हलगर्जी देखील सदर घटनेस कारणीभूत असल्याने संबंधित विभागाच्या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्याची होत असलेली मागणी, सदर एमआयडीसीतील रासायनिक कंपन्या हटवण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी करूनही मोठ्या प्रमाणावर रासायनिक कंपन्या चालू असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे या रासायनिक कंपन्या बंद करून इतरत्र हलवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(मंगळवार, दिनांक २६ जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सहा : सर्वश्री सुनिल प्रभू, राजेंद्र पाटणी, अनिल कदम, डॉ.मिलिंद माने, श्री. राजेश क्षीरसागर, डॉ. विजयकुमार गावित, श्री. सुभाष साबणे, डॉ. सुनिल देशमुख, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री. संजय केळकर, शंभुराज देसाई, डॉ.राहुल आहेर, श्री. राजाभाऊ वाजे, डॉ. संजय कुटे, श्री. राजन साळवी, डॉ. अनिल बोंडे, डॉ. शशिकांत खेडेकर, डॉ.देवराव होळी, श्री. अनिल बाबर, डॉ.तुषार राठोड, सर्वश्री. अजय चौधरी, उन्मेश पाटील, उल्हास पाटील, सुधाकर भालेराव, प्रकाश आबिटकर, प्रा. राजू तोडसाम, डॉ. संजय रायमूलकर, श्री. अतुल भातखळकर, ॲड. आशिष शेलार, श्री. अमित साटम, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

“राज्यात शासकीय रुग्णालय श्रेणीवर्धन करणे, गुणवत्तापुर्ण रुग्णसेवा पुरविण्याबाबत विविध योजना राबविण्यात येणे, राज्यातील कोकण व डोंगराळ प्रदेशात तसेच आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये वॉक इन इंटरव्यू द्वारे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पद भरती सुरु असणे, गरोदर मातांना घर ते रुग्णालय व रुग्णालय ते घर जाण्यासाठी " वात्सल्य रुग्ण वाहिका" योजना कार्यान्वित करणे, दि. ०२ ऑक्टोबर,२०१६ पासून महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजना कार्यान्वित करण्यात येणार असणे, त्याअंतर्गत आजारांची संख्या २७६ वरुन ११०० पर्यंत आणि खर्चाची मर्यादा दीड लाखांवरुन दोन लाख रुपयांपर्यंत वाढविण्याचे प्रस्तावित असणे, दि. ०२ ऑक्टोबर,२०१६ पासून बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजना कार्यान्वित करण्यात येणार असणे, कॉलेज ऑफ फिजिशियन ॲण्ड सर्जन

अंतर्गत राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे, कर्करोग टाळण्यासाठी तंबाखू सेवन नियंत्रण उपक्रम राबविण्यात येणे, राज्यभर जलयुक्त शिवार योजना राबविण्याचे शासनाचे धोरण पुर्णत्वाने फलद्रुप होणे, सद्यस्थितीत शिवारे भरभरुन वाहत असल्याचे चित्र गावोगाव दिसून येणे, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री राहुल मोटे, हसन मुश्रीफ, विजय वडेट्टीवार, सुरेश लाड, अस्लम शेख, अमीन पटेल, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, बाळासाहेब पाटील, डॉ.सतीश पाटील, श्री.वैभव पिचड, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री भास्कर जाधव, दिपक चव्हाण, संजय कदम, राणाजगजितसिंह पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड, हनुमंत डोळस, जयदत्त क्षीरसागर, राहुल जगताप, शशिकांत शिंदे, राजेश टोपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

(ख) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(ब) **विधानसभेने संमत केलेले विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १४१(१) अन्वये सभागृहाने पुन्हा संमत करणे :-**

(१) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक, २०१६**

---

(२) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २६ जुलै, २०१६

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.